Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# पर्यावरण अभ्यासाचे दृष्टिकोन

डॉ. रमाकांत श्रीहरी जाधव,
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, केडगाव,
अहमदनगर

पर्यावरणा विषयीची आपल्या पूर्वजांना जाण होती. निसर्गातील प्राणी व वनस्पती यांची निगा व वापर या बाबतीत ते जागृत झाले. शिकारी व वनसंपदांचे संकलन करणाऱ्या लोकांना त्यांच्या परीसराची चांगली माहिती होती. त्यांना आसपासचे जलस्त्रोत, वनस्पती, प्राणी, प्राण्यांचे अन्न व औषधी वनस्पतींचा वापर याची माहिती होता. अग्नी, विविध अवजारे व हत्यारे त्यामुळे त्यांचे जीवन सुकर झाले. पर्यावरणाचा वापर ते आपल्या गरजा भागविण्यासाठी करत असत ते वृक्षतोडीसाठी कुऱ्हाड वापरत असत. पण विरळ लोकसंख्या, भटक्या प्रकारची जीवनशैली व तंत्रज्ञान मागासलेपणा यामुळे त्यांचयाकडून पर्यावरणास फार मोठा धोका निर्माण झाला नाही.

शेतीची कला अवगत झाल्यानंतर प्राणी, वनस्पती व तंत्रज्ञान, हत्यारे यांच्या सहय्याने मानवी वस्त्या मोठया प्रमाणावर विकसित झाल्या. औद्योगिक क्रांतीनंतर नैसर्गिक संपत्ती, कच्चा माल म्हणून वापरण्यास सुरुवात झाली. त्यामुळे मागणी वाढली आधुनिक औजारे, खते, किटनाशके व जास्त उत्पन्न देणारी. बी–बियाने यामुळे कृषि उत्पनामध्ये प्रचंड वाढ झाली. नविन प्रगत औषधांचा शोध, सुधारीत आरोग्य, औषधांचा वापर, मृत्युदरात घट यामुळे लोकसंख्येत वेगाने प्रचंड वाढ झाली. नैसर्गिक असंतुलन निर्माण झाले. त्यामुळे असंख्य समस्या निर्माण झाल्या. या समस्या सोडविण्यासाठी पर्यावरणशास्त्राचा उगम झाला.

**व्याख्याः**

**१) पुरडोम व अॅडमन :** पर्यावरणाचे व्यवस्थापन अभ्यासाकरिता वेगवेगळया विज्ञानशाखांच्या ज्ञानाचा वापर म्हणजे पर्यावरणाशास्त्र होय. तसेच सजीवावर होणारा परिणाम, परिस्थिती व स्थितीचे विश्लेषन व त्या बदल्यात सजीवांची प्रतिक्रिया यांचा अभ्यास.

**२) मॅक नॉघटन आणि वुल्फः–** सजिवांचे जीवित विविध परीसंस्था प्रणालीच्या परस्पर संबंधाचे संतुलन तत्वावर शास्त्रीय अध्यापन होय.

**३) प्रा. बर्नाड नोबेल :–** पर्यावरण शास्त्र म्हणजे पृथ्वीवरील पर्यावरणाचे आकलन व मानवी जीवनाचा पर्यावरणावर असणारा प्रभाव यांचा अभ्यास होय.

**४) जॉन टर्क :–** पर्यावरणशास्त्र म्हणजे पृथ्वीवरील पर्यावरणाचे आकलन व मानवी जीवनाचा पर्यावरणावर असणारा प्रभाव यांचा अभ्यास होय.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

५) **डॅनिअल डिलचिरास** :— जैविक व अजैविक घटकांच्या परस्पर संबंधाचा नियोजन पूर्वक अभ्यास म्हणजे पर्यावरण होय.

वरील व्याख्यातुन नैसर्गिक, मानव व सांस्कृतिक घटक यांच्या संदर्भातील अभ्यास शास्त्रीय दृष्टीकोनातून केला जातो. मानवाला निरंतर विकासाची निश्चित दिशा मिळते.

**पर्यावरणाचे प्रकार:**

पर्यावरणाचे अर्थ सांगताना पर्यावरणाचा नैसर्गिक घटकांना त्याचप्रमाणे मानवनिर्मित घटकांचाही समावेश होतो. पर्यावरणाच्या निरनिराळया बाजू पुढीलप्रमाणे.

**पर्यावरण**

**नैसर्गिक पर्यावरण** (Natural Environment)

- अजैविक घटक
  - १) माती (Soil)
  - २) पाणी (Water)
  - ३) हवा (Air )
- जैविक घटक
  - १) प्राणी (Animals)
  - २) वनस्पती (Plants)
  - ३) सुक्ष्मजीव (Bacteria)

**मानवनिर्मित पर्यावरण** (Manmade Environment)

- १)सामाजिक पर्यावरण (Social Enivironment)
- २) आर्थिक पर्यावरण (Economical Environment)
- ३) तांत्रिक पर्यावरण (Technological Environment)
- ४) सौंदर्यात्मक पर्यावरण (Aesthetic Environment)
- ५) सांस्कृतिक पर्यावरण (Cultural Environment)

नैसर्गिक पर्यावरणामध्ये निसर्ग निर्मित घटकांच्या समवेश होतो. सजिवांच्या वाढीसाठी, निसर्ग

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

निर्मित घटकांची आवश्यकता असते. या घटकांच्या परस्पर संबंधातून शुध्द पर्यावरण तयार होते. कोणतेही घटक कमी जास्त झाले तर त्यांचा परिणाम सजीवांच्या विकासावर होतो.

मानवाशी समाज या शब्दाचा संबंध येतो, मानव एकटा राहत नसून तो कुटुंबात राहतो अनेक कुटुंब मिळून समाज बनतो. समाजाचा विकास व्हावा म्हणून समाज काही नियम तयार करतो. काळानुरुप त्यात बदल होतात.

पर्यावरण आणि स्त्रिया:— समाजव्यवस्थेचेमधील प्रबळ आणि दुय्यम स्थानावरील घटकामधील परस्परसंबंधाचा विशेषत:स्त्रिया आणि अमानवी असा निसर्ग यांच्यामधील परस्परसंबंधचा निसर्गावरील आणि स्त्रियावरील वर्चस्वाचा विचार या दृष्टीकोनात होतो. त्यांच्या क्षमतेचा विचार केला तर पर्यावरणामध्ये क्रांती घडवून आण्याचे काम त्या करतात. (निसर्ग) पर्यावरण आणि स्त्रिया यांच्या मधील निरनिराळया तऱ्हेचे परस्परसंबंध दाखवून देण्यासाठी म्बवतिमउपेपदेउ या शब्दांचा वापर केला जातो.

समाज व्यवस्थनेमधील सर्व आंरसंबंधाचा विचार यात केला जातो. उदा. वंशवाद, साम्राज्यवाद, वसाहतवाद यामधील आंतरसंबंधाचा विचार करतो.

Women add nature – The Roamining Inside Her (1978) या पुस्तकामध्ये सुसान ग्राफिन यांनी स्त्रिया आणि निसर्ग यांच्यामधील परस्पर संबंध भौतिक भाविक आणि विशिष्ट स्वरुपाचे असतात. याउलट पुरुष संकृतिक, अभौतिक संकृति, असचेतन, घटकाशी निगडीत असतात. पुरुषांशी संबंधीत गुणवैशिष्टे स्त्री आणि निसर्गाशी सबंधीत गुणवैशिष्टयावर वर्चस्व मिळवतात.

The Power and Promise of ecofeminism या लेखामध्ये कॅरेन वॉरन यांनी मानव आणि मानतेवर निसर्ग यांच्यामधील नैतिक दृष्टया महत्वाचे फरक मांडले आहे.

१) समुदायामध्ये मानव राहतो, प्रयत्न पूर्वक बदल करण्याची क्षमता मानवामध्ये असते वनस्पतीमध्ये अशी क्षमता नसते.

२) ही क्षमता नैतिक दृष्टया श्रेष्ठ असते.

३) स्त्रीयाचासंबंध निसर्ग आणि भौतिक क्षेत्राशी असतो तर पुरुषांचा मानव आणि मनासिक क्षेत्राशी असतो.

४) नैसिर्गक भौतिक क्षेत्र मानवी व मानसीक क्षेत्रापेक्षा निम्न दर्जाचे असते.

५) आशा तऱ्हेने स्त्रिाया पुरुषापेक्षा कमी दर्जाच्या असतात.

६) स्त्रियाना दुय्यमत्व देण्याचे काम पुरुष करतात.

पर्यावरणाच्या ऱ्हासाविरुध्द अनेक ठिकाणी स्त्रियांनी पाऊल उचचले आहे. उदा. मेक्सिकोमध्ये जागतिक विकसाच्या योजनामुळे पर्यावरणाच्या होणाऱ्या नाशाविरुध्द सैनिकांनी संघर्ष केला. यात स्त्रियांचा सहभाग आहे. भारतामध्ये गढवाल, कुमाऊॅ भागात स्त्रियांनी जंगलतोडी विरुध्द चिपको अंदोलनात मोठयाप्रमाणात सहभाग धेतला औद्योगिकरण होत असलेल्या समाजामधील स्त्रि:याही प्रदुषणाच्या वाईट

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

परीणामाविरुध्द झगडत आहेत.

पर्यावरण ऱ्हासाविरुध्द स्थानिक स्त्रियाप्रमाणे Unied Nations development fund of woman या जागतिक संधटनेनेटी बॅंकेच्या आणि इतर आर्थिक मदत देणाऱ्या इतर संस्थांच्या कार्यकामावर टीका केली आहे.

अनेक छोटया मोठया बाबीमधून पर्यावरण विषयी आपुलकी दाखवून समतोल राखण्यास मदत होते. पर्यावरण रक्षणाशिवाय विकास साधता येत नाही. प्रदुषणासाठी मानवी विकास, कल्याण व पर्यावरण यांची सीमारेषा ठरविण्याची गरज आहे.

पर्यावरणाच्या समस्या समजावून घेणे, कारणांचा शोध लावणे, भयानक परीणाम तपासणे अभ्यासणे त्यावर मार्ग सुचविणे लोकजागृती करणे पर्यावरणाचा तोल पुन्हा मूळ पदावर आणवे. त्याचा संवर्धनासाठी तत्कालीन उपाय, अल्पकालीन नियोजन, दिर्घकालीन नियोजन करुन प्रश्न सोडविणे. मानवाच्या अती हसतक्षेपामुळे नैसर्गिक चक्र खंडीत झाले. संतुलन बिघडले आहे त्यामुळे पर्यावरण संबंध गुंतागुंतीचे बनत आहेत.

पर्यावरच्या रक्षणासाठी आपला देश २०२० नंतर कार्य (इंटेडेड नॅशनली डिटर्मिन्ड कॉन्ट्रीब्युशन आसएनडीसी) हाती घेणार आहे. ही २१ वी परीषद असेल प्रत्येक देशाने १ ऑक्टोबर पूर्वी आपआपल्या देशाचा आराखडा संयुक्त राष्ट्रसंघाकडे सादर करावयाचा आहे. प्रदुषणाला जास्त जबाबदार आहे, तरी अमेरीका जागतीक तापमान वृध्दीस (ग्लोबल वॉमिंग)कारणीभूत वायूंचे प्रमाण कमी करण्याच्या प्रस्तवाच्या विरोधात अमेरीका आदळ आपट करते.

पर्यावरणाचे पुस्तकी धडे घेत असतांना एक सजग विद्यार्थी म्हणून शाळा, कॉलेजची पर्यावरणीय सद्स्थिती जाणून घेण्यासाठी विद्यापीठातील पर्यावरण विभागाने कानाकोपऱ्यातील ओला सुका केरकचरा गोळा करुन कंपोस्ट खत निर्मिती करावी व त्यापासून शाश्वत उत्पन्न मिळवावे. काही वस्तुंची रीसायकल करुन पुनर्वापर करावा. प्रत्येक विद्यार्थ्यांने पर्यावरणास पूरक असे ठोस काहीतरी काम केले पाहिजे शाळांचे किंवा विद्यापीठ, महाविद्यालयांचे ग्रीन ॲडीट करण्याचे निश्चित केले पाहीजे. मुख्याध्यापक, शिक्षक, शिपाई, सफाई कामगार यांच्याशी चर्चा करुन पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याबद्दल चर्चा व्हावी विद्यार्थींना आपले घर, शेती, सार्वजनिक, ठिकाणे इ. सर्व ठिकाणी पर्यावरणास पूरक असे कार्य करावे. तशी जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण व्हावी.

**संदर्भ :**

१) पर्यावरणशास्त्र – डॉ. विठ्ठल घारपुरे
२) पर्यावरण आणि समाज – प्रा.डॉ. रेणावीकर माधवी
३) पर्यावरण आणि समाज – प्रा.कुलकर्णी शिल्पा
४) दै.महाराष्ट्र टाईल्स नगर आवृत्ती
५) विज्ञान, तंत्रज्ञान पर्यावरण आणि आरोग्य. य.य.म.मुक्त विद्यपीठ नाशिक